**प्रकरण :- पहिले**

# प्रस्तावना

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण :- पहिले | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | 01. **प्रस्तावना** | 01-33 |
| 1.1 | प्रस्तावना | 03 |
| 1.2 | स्त्रीचे कुटुंबातील व समाजातील स्थान | 08 |
| 1.3 | इतिहासाचा आढावा | 08 |
| 1.3.1 | टोळीजीवन | 08 |
| 1.3.2 | कृषी अवस्था | 09 |
| 1.3.3 | वेद काळ | 09 |
| 1.3.4 | स्मृति पुराण | 11 |
| 1.3.5 | बौध्द व जैन संप्रदाय | 11 |
| 1.3.6 | ऐतिहासिक काळ | 11 |
| 1.3.7 | स्वातंत्रोत्तर काळ | 13 |
| 1.3.8 | शैक्षणिक स्थिती | 14 |
| 1.3.9 | राजकीय स्थिती | 16 |

| | | |
|---|---|---|
| 1.4 | व्यवस्थापन | 19 |
| 1.4.1 | गृहव्यवस्थापन | 20 |
| 1.4.2 | गृहव्यवस्थापणाची भूमिका | 21 |
| 1.5 | संशोधन अभ्यासाचा उद्देश | 22 |
| 1.6 | संशोधन अभ्यासाची गृहितके | 23 |
| 1.7 | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | 25 |
| 1.8 | संशोधन अभ्यासाचे अपेक्षित योगदान | 25 |
| 1.9 | संशोधन अभ्यासाची निवड | 26 |
| 1.10 | संशोधनाचा आराखडा | 28 |

# प्रकरण - पहिले
# प्रस्तावना

## 1.1 प्रस्तावना

भारतात कुटुंबात स्त्रियांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. कुटुंब आणि स्त्रिया यांना एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. महिलाशिवाय कुटुंब ही कल्पनाच करता येत नाही. कुटुंबात महिलांना वेगवेगळया भूमिका बजावाव्या लागतात. उदा. आजी, आत्या, काकी, मावशी, आई, पत्नी, मुलगी, सून इत्यादी वेगवेगळया नात्यातून कुटुंबाला आधार देण्याचे कार्य ती करीत असते. कुटुंबात उत्तम गृहिणी म्हणून ती कार्य करीत असतेच तसेच तिचे इतर क्षेत्रातही ती कार्य करीत आहे. सामाजिक, राजकीय, अर्थिक, वैद्यकीय, शैक्षणिक सर्वच क्षेत्रात ती कार्यरत आहे. सर्व क्षेत्रात पदार्पण झाले असले तरी कुटुंबातील कार्यही तेवढेच महत्वाचे आहे. कुटुंबासाठी जे कार्य करीत आलेली आहे त्या कार्याचे मूल्य करता येत नाही.

कुटुंबसंस्था ही एक सामाजिक संस्था आहे. कुटुंबास एक सामाजिक समूह, एक सामाजिक घटक, एक मंडळ, संघटन आणि एक सामाजिक व्यवस्था सुध्दा मानले जाते. कुटुंबास खुप महत्व आहे. कारण व्यक्ति तसेच संपूर्ण समाज याच्यांसाठी महत्वाची कार्य पार पाडते. त्यामुळे कुटुंबाला केंद्रस्थान प्राप्त झाले आहे. हे सामाजिक संरचनेचा कणा आहे. त्यामुळे कोणत्याही समाजाचे स्वरुप समजण्यासाठी कुटुंबांस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ही गोष्ट भारतीय समाजासही लागू पडते.

कुटुंब :- कुटुंबात पुरूष व स्त्री त्यांची मुले आणि नोकर तसेच काही नातलग याचा समावेश होत होता. आधुनिक काळात कुटुंबात पती, पत्नी व त्याची स्वतःची किंवा दत्तक घेतलेली मुले यांचा समावेश होतो.

ऑग्बर्न च्या मते, कुटुंब हे मुलासह किंवा मुलाशिवाय असलेले पती व पत्नीचे किंवा मुलासह एकटया पुरुषाचे किंवा एकटया स्त्रीचे कमी जास्त प्रमाणात दीर्घकाळ टिकणारी मंडळ आहे.क्लअर च्या मते, कुटुंब ही पालक आणि मुले यांच्यामध्ये अस्तित्वात असलेल्या परस्पर संबंधाची व्यवस्था आहे.

कुटुंब ही सार्वत्रिक स्वरूपाची सामाजिक संस्था आहे. ती सर्व मानव समाजात आढळते. कुटुंबातील सर्व सदस्य हे परस्परांशी रक्तसंबंधाने जोडलेले असतात. पालक व मुले यांच्यात रक्तसंबध असतात.सर्व सदस्य हे एकाच निवासस्थानात राहतात. नोकरी शिक्षण यासारख्या कारणसाठी वेगवेगळया ठिकाणी राहतात. कुटुंबाची उभारणी प्रेम, जिव्हाळा सहानुभूती, सहकार्य, मित्रत्व या भावनावर झालेली आहे. कुटुंबातील सदस्यास काही जबाबदाऱ्या व कर्तव्ये असतात आणि ते अतिशय प्रामाणिकपणे पार पाडतात.

‘पूर्वी स्त्रीने घरातील व पुरूषाने घराबाहेरील कामे सांभाळावीत ही सामान्य गोष्ट मानली जात असे. त्यामुळे स्त्रिया घरातील सर्व कामे व बालसंगोपन याकरिता बराच वेळ मिळत असे. हे सर्व कामे करीत असताना परंपरागत मार्गाचा व पध्दतीचा वापर करण्यात येई. एकत्र कुटुंब पध्दती अस्तित्वात असल्यामुळे कामाचे विभाजन घरातील सर्व स्त्रियांमध्ये झाल्याने काम लवकर होत असे व श्रमही जाणवत नसे. महिलांचे क्षेत्र हे मर्यादीत होते. काळानूसार महिलांच्या कार्यातही बदल होते गेले. वाढती महागाई व कुटुंबाचा जीवनस्तर उंचावणे व वाढत्या महागाईमध्ये कुटुंबातील सदस्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता कुटुंब प्रमुखाला आर्थिक सहकार्य म्हणून स्त्री अर्थाजन करण्याकरिता घराबाहेर पडली आहे. बऱ्याचशा स्त्रिया स्वत:चे करिअर बनविण्यासाठी किंवा नोकरी व्यवसायात उतरल्या आहेत तर काही

सुखवस्तू घरातील स्त्रिया आपल्या फावल्या वेळात वेळेचा उपयोग समाजाकरिता व्हावा म्हणून समाजकार्य करताना दिसतात. हे सर्व करीत असताना मर्यादित शक्ती व वेळ या साधनसंपत्तीचा मेळ घालणे कठीण होत आहे. याचा परिणाम महिलांना गृहकार्य एक समस्या म्हणून भेडसावत आहे त्यामुळे गृहव्यवस्थापन करणे अगत्याचे झाले आहे. घराला घरपण आणावयाचे असल्यास गृहव्यवस्थापन करणे आवश्यक झाले आहे. यालाच कौटुंबिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन असेही म्हणता येईल. व्यवस्थापन हे कुटुंबातील सदस्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर परिणाम करते. याद्वारे गृहिणी कौटुंबिक उद्दिष्ट व ध्येय गाठण्याचा प्रयत्न करते. प्राचीन काळात देखील व्यवस्थापन केले जात असे परंतु ते तेवढे काटेकोर व शास्त्रीय स्वरुपाचे नव्हते. समाज परिवर्तन, वाढत्या जबाबदाऱ्या, विभक्त कुटुंब पद्धती यामुळे गृहिणीला व्यवस्थापन करणे अत्यावश्यक झाले आहे. व्यवस्थापन हे प्रत्येक घरात केले जाते. परंतु ते काळजीपूर्वक व विचारपूर्वक न केल्यास साधनसंपत्तीचा अपव्यय होवून उद्दिष्टप्राप्ती समाधानकारकरित्या होत नाही’ [1]

पिटरसन आणि प्लाउमन याच्या मते, ‘व्यवस्थापन असे तंत्र आहे, ज्याच्या साहाय्याने विशिष्ट व्यक्तिसमूहाचे हेतू आणि उद्दिष्टे निश्चित केली जातात, त्यांचे स्पष्टीकरण केले जाते आणि ते साध्य करून घेण्याकरिता प्रयत्न केले जातात.’[2] महिला अनेक क्षेत्रात कार्य करीत असल्या तरी तिचे कौटुंबिक स्तरावर कार्य फारच महत्वाचे आहे.

कुटुंबात गृहिणी म्हणून काम करीत असताना सकाळपासून ते संध्याकाळी झोपी जाईपर्यत ती काम करीत असते. जे घरातील दिसेल ते काम करणे एवढेच गृहिणीला माहित होते. सर्व व्यक्तिच्या गरजाची पूर्तता

करण्यातच तिचा पूर्ण दिवस जात असे. नोकरी करणारा आठ तास काम करून त्यास घरी जाता येते. पण पूर्ण वेळ कुंटुंबासाठी राबणारी गृहीणी असू शकते. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता गृहिणी सतत कार्य करीत असते. सकाळपासून संध्याकाळपर्यन्त केलेल्या कार्याचे मोजमाप जर पैशात केले तर सर्वात जास्त पगार गृहिणीचा असेल. भांडे-धुणे, साफसफाई करणे, स्वयंपाकघरातील कार्य, जेवण बनविणे, जेवण वाढणे, मुलांची देखभाल करणे, आजारी व्यक्तिची सेवा करणे, घर व्यवस्थित ठेवणे. असे अनेक कार्य असतात त गृहिणी कोणताही मोबदला न घेता ते कार्य पूर्ण करीत असते. ते फक्त आपल्या कुटुंबातील व्यक्तिच्या समाधानासाठी. आपले कर्तव्य म्हणून पार पाडीत असते. कुटुंबात अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. अनेक अडचणी येतात त्या सर्व अडचणीवर उपाय योजले जातात व समाधान मिळविले जाते. कुटुंबातील योग्य व्यवस्थापनामुळे सदस्यांचा विकास होतो. आजपर्यत आपण फक्त व्यवसाय, उद्योगात व्यवस्थापन हा शब्द परिचयाचा होता. व्यवस्थापन प्रत्येक क्षेत्रात केले जाते. कुटुंब, शाळा-महाविद्यालय. रुग्णालय, हॉटेल. व्यक्तिचा समूह-संघ, धर्मदाय संस्था या सर्वांशी व्यवस्थापनाचा घनिष्ट संबंध आहे. शाळा-महाविद्यालयाचे व्यवस्थापन प्राचार्य करतात. रुग्णालयाचे व्यवस्थापन रुग्णालयाचा प्रमुख वैद्यकीय अधिकारी करीत असतो.

गृहव्यवस्थापन ही सर्व देशामध्ये अत्यंत सामान्य व्यवस्था आहे. ज्यामध्ये जास्तीत जास्त व्यक्ति कार्य करीत असते तसेच मोठया प्रमाणावर संपत्तीचा उपयोग केला जातो हे कुटुंबाच्या व्यक्तिच्या स्वास्थ्याच्या दृष्टिने अधिक महत्वपूर्ण आहे. जास्तीत जास्त समाधान मिळविण्यासाठी कुटुंबातील मानवी व भौतिक साधनाचा उपयोग करून योजना आखणे, निर्देशन, मार्गदर्शन करणे सहकार्याने कार्य करणे म्हणेच गृहव्यवस्थापन होय.

माणवाच्या गरजा अमर्यादीत आहेत तर साधने मर्यादीत आहेत. त्यामुळे कौटुंबिक साधनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन करुन अपेक्षित गरजाची पूर्तता करणे गरजेचे असते. एक गरज पूर्ण झाली की, दुसरी गरज निर्माण होत असते. त्यामुळे कमी साधन खर्च करुन जास्तीत जास्त समाधान प्राप्त करणे आवश्यक असते. एका समस्येकरिता अनेक पर्यायी मार्ग असतात. त्यातून योग्य असा मार्ग निवडने कठीण जाते. त्यावेळी व्यवस्थापनाची गरज असते.

गृहव्यवस्थापन ही एक मानसिक प्रक्रिया आहे. यात अनेक घटकाचा समावेश होतो. नियोजनापासून त नियंत्रणापर्यत सर्व कार्याचा समावेश होतो. ज्याव्दारे कुटुंबातील साधन संपत्तीचा योग्य वापर करून नियोजित उद्दिष्ट प्राप्त केले जातात. गृहव्यवस्थापन ही निरंतन चालणारी प्रक्रिया आहे. नियोजन व नियंत्रण हे दोन्ही आवश्यक, परस्परक कार्ये आहे. नियोजन हे काम सुरू करण्यापूर्वी व नियंत्रण नियोजनाप्रमाणे कार्य होते कि नाही, लक्ष्यप्राप्ती किती प्रमाणात झाली हे बघण्याकरिता नियंत्रणाची गरज असते. यात अनेक प्रकारचे निर्णय घ्यावे लागतात. त्यातून योग्य निर्णय घेतल्यास उद्दिष्टप्राप्ती होण्यास मदत होते. कार्य सफल होते.

ज्या वस्तूचा कुटुंबाच्या कामाकरिता उपयोग केला जातो. अशी वस्तू म्हणजे कौटुंबिक साधनसंपत्ती होय. गृहव्यवस्थापन हे कौटुंबिक साधनसंपत्तीशिवाय होऊ शकत नाही. या साधनाचा उपयोग कौटुंबिक ध्येय, उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, समाधान प्राप्त करण्यासाठी केला जातो. गृहिणी जेवढया जास्त कौशल्याने व काटकसरीने साधनसंपत्तीचा उपयोग करेल तेवढे गृहव्यवस्थापन चांगले होण्यास मदत होईल.

## 1.2 स्त्रीचे कुटुंबातील व समाजातील स्थान

निसर्गाने निर्माण केलेल्या फक्त दोनच मनुष्यजाती एक स्त्री व दुसरी पुरूष दोघांनी परस्परांना पूरक बनावे एकमेकांच्या सोबतीने राहावे आणि समाजधारणेचा प्रवाह कायम राखावा असा निसर्गाचा संकेत. निसर्गाने स्त्रीवर एक फार मोलाची जबाबदारी सोपविली आहे. मातृत्वाची, समाजाने अनादिकालापासून मातेची थोरवी सर्वत्र गायली आहे. मातृत्वामुळे स्त्रीला एक गौरवाचे स्थान मिळाले आहे.

संस्कृतीच्या उदयापूर्वी विवाह संस्था, कुटुंबसंस्था निर्माण होण्यापूर्वी टोळीजीवनातमानव राहत असताना स्त्रीला पुरूषाप्रमाणेच मान मिळत असे अशी माहीती मिळते. वेद काळात आर्याच्या उच्च संस्कृतीत स्त्रीला पुरूषाच्या बरोबर बऱ्याच संधी उपलब्ध होत्या. गेली सतरा अठरा शतके स्त्री ही कुटुंबात समाजात कनिष्ट लेखली गेली. चूल आणि मूल हेच तिचे प्रधान कार्य मानले गेले.

## 1.3 इतिहासाचा आढावा

विभिन्न काळात स्त्रियांची भूमिका आणि स्थिती कशी बदलत गेली. तिचे स्थान कसे घसरत गेले व पुन्हा उंचावले हे समजण्यासाठी इतिहासाचा आढावा घेणे योग्य ठरेल.

### 1.3.1 टोळीजीवन

फार फार पूर्वी मनुष्य हा टोळी करून राहत होता. टोळीत स्त्री व पुरुष दोघेही असत. पुरूष शिकारीचे काम करीत असे व स्त्रिया आणलेल्या

शिकार भाजण्याचे व सर्वाना वाटप करण्याचे काम करीत. या टोळीमध्ये स्त्रीचे स्थान पुरूषापेक्षा कमी नव्हते. टोळीचे नायक कधी पुरूष असत तर कधी स्त्रियांही असत. म्हणजेच नायकत्वाला आवश्यक संघटन कौशल्य, दरारा हे गुण स्त्रियांतही होते गरज भासली त्याप्रमाणे मातीची भांडी करणे, चमचे करणे, झाडाच्या सोपटापासून टोपल्या विणणे. या सर्व गोष्ट त्यावेळी स्त्रीच्या संशोधनातून निघालेल्या आहेत. स्त्रीला संस्कृतमध्ये 'वयन्ती' असे म्हटले आहे. वयन्ती म्हणजे विणनारी. झाडाच्या पानापासून वल्कले तयार करणे व नंतर वस्त्र विणणे ही कामेही स्त्रियांनी केली. इतकेच काय, शेतीचा शोधदेखील स्त्रीच्या चौकस बुध्दीतूनच निघाला असे बिल ड्यूरांड हा युरोपीय समाजशास्त्रज्ञ सांगतो. टोळी म्हणजे एक प्रकारचे सामूहिक कुटुंबच होते. स्त्रिया आणि पुरूष दोघांनाही त्यात समान स्थान होते.

### 1.3.2 कृषी अवस्था

शेतीचा शोध लागला आणि माणसाचे भटके जीवन संपले. विवाहसंस्था कुटुंबसंस्था माणसानेच निर्माण केल्या. जमिनीवर स्थिर जीवन सुरू झाले आणि मालकी हक्काची कल्पनाही उदयमान झाली. मनुष्य घर बांधून राहू लागला. स्त्री-पुरूष शेतीवर राबत होते. पण श्रमविभागणी करावीच लागली.

### 1.3.3 वेद काळ

वेदिक काळात स्त्रिला समाजात मानाचे स्थान होते. स्त्री-पुरूषांच्या सामाजिक दर्जात असमानता नव्हती. स्त्रियांही अनेक बाबतीत पुरूषांच्या बरोबरीने हक्क उपभोगित होत्या मुलीचे लग्नांचे वय सामान्यत: सोळा वर्षाचे होते तोपर्यन्त मुलींनाही शिक्षण मिळत असे. महाकाव्य लिहिणारी गंगादेवी,

घोषा, सूर्या, शची, गार्गी, मैत्रेयी, सुलभा या विद्वान स्त्रिया याच वेद काळात होवून गेल्या आहेत.

वेदकाळात अनेक क्षेत्रात स्त्रीचे स्थान पुरूषांबरोबरीचे होते परंतु याचा अर्थ सर्वच बाबतीत स्त्री-पुरूष समता झाली होती असे मात्र नाही. पुरूषाच्या बरोबरीन यज्ञकर्मात स्त्रिया भाग घेत किंबहुना स्त्रियांना पतीच्या गैरहजेरीत अनेक धार्मिककृत्ये करता येत असते. काही बाबतीत पुरूषांचे वर्चस्व होते.[3]

वैदिक काळात स्त्रियांना गौरवपूर्ण स्थान प्राप्त झाले होते. विधवांबाबत तत्कालीन समाजाचा दृष्टिकोन उदारमतवादी होता. विधवा स्त्री पुनर्विवाह करू शकत असे व विवाह न करता चिरकाल ब्रम्हचर्य पाळून राहणाऱ्या स्त्रियांकडे समाज आधुनिक काळाप्रमाणे उपहासाने व वाईट दृष्टिने पाहात नसे. वैदिक समाजात स्त्रियांना सन्मानाने वागविले जाई. त्याच्याकडे उदार दृष्टिकोनातून पाहिले जाई. स्त्री ही घरची सम्राज्ञी आहे हा वैदिक संस्कृतीचा आदर्श होता.

पुरुषाप्रमाणे स्त्रियांना तेव्हा स्वातंत्र, बौध्दिक व आत्मिक जीवन होते. या जीवनाला आावश्यक असे उच्च शिक्षण त्यांना मुलांना बरोबरीने मिळत असे. स्त्री विद्यार्थीनीचे दोन गट असत. सद्योव्दाहा व ब्रम्हवादिनी. पहिल्या प्रकारच्या विद्यार्थीनी सोळाव्या वर्षापर्यत शिक्षण घेवून मग अनुरूप पतीशी विवाह करीत असत. ब्रम्हवादिनी स्त्रीया विवाह न करता वा विवाहानंतरही उच्च शिक्षण घेत असत. ब्रम्हचर्याच्या काळात योग्य शिक्षण घेतल्याने मुलीला योग्य पती मिळतो असा स्त्री शिक्षणाची प्रतिष्ठा करणारा समाज त्यावेळचा होता. 8-9 वर्षाच्या काळात स्त्रीया वैदिक स्तोत्रे व नित्यनैमित्तिक कृत्यांना लागणारी सूत्रे मुखोद्‌गत करीत. उच्च दर्जाची पंडिता होणे हे ब्रम्हवादिनी

स्त्रियांचे ध्येय असे. वेद कालीन स्त्रियांची स्थिती फार काळ तशीच टिकली नाही. देश, काल, परिस्थिती आणि समाजिक मूल्येही बदलत होती.[4]

### 1.3.4 स्मृति पुराण

या काळात स्त्रियांचा दर्जा घसरत जाण्यास सुरूवात झाली. परकीय हल्ले आणि श्रमविभाजन, यामुळे स्त्री घरातच राहू लागली. स्त्रीच्या जीवनाची गती लग्नातच आहे असे मनूने सांगितले व 8 व्या वर्षी तिचे लग्न करावे असेही सांगून टाकले.

### 1.3.5 बौध्द व जैन संप्रदाय

बौध्दकाळातही स्त्रियांना मानाचे स्थान होते. असे आढळून येते. कारण अनेक धर्मोपदेशिका व वक्त्या प्रसिध्दी पावल्या. आतापर्यन्त चार भितींच्या आत कोंडल्या गेलेल्या स्त्रियांना बौध्दधर्माने अनेक सामाजिक सेवेची दालने खुली करून दिली. जैन संप्रदायातही स्त्रियांबद्दल आदर होता.

### 1.3.6 ऐतिहासिक काळ

सामाजिक व धार्मिक संकीर्णतेचा काळ म्हणून या काळाचा उल्लेख होतो. स्त्रिची हळूहळू होत असलेली अवनती यानंतर इतक्या पराकोटीला पोचली की स्त्री मनाने, बुध्दीने, शरीराने, विचारांनी पूर्णपणे पुरूषांची दासी बनली. युध्दामुळे स्त्री ही रक्षणाची वस्तू बनली अर्थाजन करणारा पुरूष हा अधिकाधिक वर्चस्व गाजवू लागला. स्त्री ही त्यांच्या अंकित कनिष्ट अशी घटक बनली. कुटुंबात ती पाल्य व पुरुष पालक बनला. आणि समाजात तर तिला स्थानच उरले नाही. शेतावर काम करणाऱ्या स्त्रिला आर्थिक स्वातंत्र

घटक कोणी मानत नसे. तिला मालमत्तेत वाटा नव्हता. फक्त स्त्रीधनावर तिला अधिकार होता. बालविवाह रूढ झाले तेव्हापासूनच मुलीचे शिक्षणच बंद झाले. घरात सासूरवास भोगावा लागे. पती हाच देव. सासू-सासरे हेही देवासमान असे तिला शिकविले जाई. केशवपनाची चाल, सतीची चाल, याच काळात सुरू झाली. महाराष्ट्रातही सतीची चाल होती. माधवराव पेशव्याच्या पत्नी रमाबाई स्वखुषीने सती गेल्या होत्या. सुसंस्कृत धार्मिक वृत्तीच्या स्त्रियांच्या मनात ‘सती जाणे हा स्त्रीचा धर्म’ ही भावना ठरवून दिली होती.

स्त्रीबाबतचा कायदा अन्यायाचा होता. स्त्रीला वारसा अधिकार नव्हता. दत्तक घेण्याचा अधिकार नव्हता आणि असलाच तर पतीच्या संमतीनेच, तिला स्वतंत्र अधिकार नव्हता. पुनर्विवाह करण्याचा अधिकारही रूढीने दिलेला नव्हता. हा काळ इतका मोठा होता की, प्रतिभावान मोजक्या स्त्रिया वगळल्या तर बाकी सामान्य स्त्रिया ह्या अज्ञानअंधकारात आणि दास्यत्वात खोल खोल रूतत गेल्या. स्त्रियाच्या अज्ञानाच्या सेवेच्या त्यागाच्या पायावर कुटुंबाची उभारणी होत होती. माता म्हणून शब्दानेच तिचा गौरव शिल्लक राहिला होता. प्रत्यक्षात ती पाल्य, राबणारी पण स्वातंत्र नसलेली स्त्री बनली.

**स्त्रियांच्या स्थितीत सुधार.:-** 19 व्या शतकात प्रगतीशील लोकाच्या विचारात व प्रवृत्तीत अनेक कारणांनी बदल झाला. पाश्चात्य समाजातील स्वातंत्र व समानतेच्या तत्वाने प्रभावित होवून ते आपल्या सामाजिक परिस्थितीचा विचार करू लागले.1829 मध्ये सती प्रथा बंद करण्यात आली. दयानंदच्या आर्य समाजाने देखील बालविवाह, पडदाप्रथा आंदोलने केले. 1856 मध्ये विधवा पुनर्विवाह अधिनियम, पारित करण्यात आला. केशवचंद्र सेन यांच्या प्रयत्नांनी 1872 च्या कायद्यानी मुर्लीकरिता विवाहाचे वय 14 वर्षे करण्यात आले 1851

मध्ये मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याच्या उद्येश इंडियन सोसायटी ची स्थापना करण्यात आली. या शतकात भारतात स्त्री शिक्षणाचा बराच प्रसार झाला. याच काळात थोडया प्रमाणत का होईना पण स्त्रिया शिक्षक, परिचारिका, डॉक्टर वगैरे व्यवसाय करू लागल्या. स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टिने अनेक समाज सेविकाने केलेले कार्य देखील महत्वाचे आहे.

### 1.3.7 स्वातंत्रोत्तर काळ

भारतात खऱ्या अर्थाने परिवर्तनाची सुरूवात स्वातंत्र प्राप्तीनंतर झाली. स्त्रियांच्या बाबतीत फार महत्वाचे निर्णय घेण्यात आले. सामाजिक, आर्थिक विकासाच्या कामात स्त्रियांना समान संधी देणे, राजकारणात राखीव जागा देण्यात आल्या. स्वातंत्र प्राप्तीनंतर स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टिने अनेक प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष प्रयत्न झालेत. राज्यघटनेत स्त्री-पुरूषांना समान अधिकार दिले गेलेत. या कायद्यामुळे ब-याच प्रमाणात स्त्रियांवर लादलेल्या अयोग्यता दूर होण्यास मदत झाली व त्यांना पुरूषांच्या बरोबरीने अधिकार दिले गेले. 1955 च्या विवाहविषयक कायद्याने बहुविवाहाची प्रथा बंद केली. 1976 च्या नवीन दुरूस्तीनुसार या कायद्यानुसार विवाह विच्छेदित पत्नीला पोटगीची व्यवस्था करण्यात आली. 1961 च्या हुंडा प्रतिबंधक कायद्याने हुंडा प्रथेला शह दिला. या सर्व वैज्ञानिक सोयीचा परिणाम पटकन जाणवणारा नसला तरी स्त्रीचा सामाजिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टिने हे एक महत्वाचे पाऊल आहे ही बाब नाकारता येत नाही. स्त्रियांत शिक्षणाचा अभाव हे त्याच्या निम्न सामाजिक दर्जाचे प्रमुख कारण होते. स्वातंत्र प्राप्तीपूर्वी स्त्री शिक्षण संबंधात बरेच प्रयत्न झालेत पण स्वातंत्र्योत्तर काळात या प्रयत्नांना

खरी गती मिळाली. 1991 मध्ये सुशिक्षित स्त्रियांची संख्या 52.2 % झाली तर 2011 मध्ये सुशिक्षित स्त्रियांची संख्या 61.46 % झाली आहे.[5]

महिलांचा सर्वच क्षेत्रात कमी जास्त प्रमाणात सहभाग असला तरी तिचा 100 टक्के सहभाग कौटुंबिक व्यवस्थापनात असतो. काळानुसार त्यांच्या कार्यात बदल झालेले आहेत.

**1.3.8 शैक्षणिक स्थिती**

भारत हा देश विकसनशील देश आहे. आपल्या देशाची संस्कृती रूढी, परंपरा याचा पगडा समाजावर आहे. आजही ग्रामीण भागात मुलगी परक्याच्या घरी जायची आहे. ती जास्त शिकून काय करायचे, म्हणून मुलीचे शिक्षण बंद केले जाते. घरकामासाठी मुलापेक्षा मुली जास्त उपयुक्त मानल्या जातात. त्यांनी कितीही शिकले तरी ‘चूल आणि मुल’ सांभाळायचे आहे. शिक्षण हे नोकरी मिळविण्यासाठी नाही घ्यायचे तर स्वतःच्या सर्वागिण विकासासाठी शिक्षण घ्यायचे. स्वतःच्या इच्छांची पूर्ती करण्यासाठी शिक्षण हे साधन आहे. शिक्षणाचे महत्व ओळखून सुध्दा स्त्रियांनी शिक्षण घ्यावे.[6]

विकसनशील देशात 5 मुलीपैकी 1 मुलगी आपले शिक्षण पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे 20% मुलीचा शैक्षणिक विकास जवळजवळ खुंटल्यासारखा होतो. या अवस्थांचा संपूर्ण आयुष्यावर परिणाम होतो. विकसनशील देशांमधील अवघ्या 43 टक्के मुली माध्यमिक शाळेत जातात. दक्षिण आशियात शैक्षणिक तफावत सर्वात अधिक आहे. मुले शाळामध्ये 2.5 वर्षे अधिक शिकतात. तर मुली कमी काळ शिकतात. उपसहारा आफ्रि केत तर मुली 1.3 वर्षे कमी वर्षे शिकतात. लॅटिन अमेरिका व कॅरेबियणमध्ये एक वर्ष

कमी शिकतात. त्यामुळे स्त्री - पुरूष विषमतेत वाढ होते आणि स्त्रियांचे खुप नुकसान होते. जगभर बालविवाहाचे प्रमाण 36% आहे. म्हणजे 20-24 वयोगटातील विवाहित स्त्रिया 18 वयाच्या आधीच विवाहबध्द होतात. दक्षिण आशिया व उपसहारा आफ्रिकेमध्ये प्रामुख्याने हे बालविवाह होतात अर्थिक गरजेमुळे वा विवाहामुळे मुली सुरक्षित होतात ह्या भावनेमुळे पालक मुलींच्या बालविवाहांना संमती देतात, त्यामुळे अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते.

मुलीच्या शिक्षणास स्त्रियांनी महत्व, अग्रक्रम द्यावा म्हणून त्याना सक्षम करायला हवे, मुलांच्या-मुलींच्या शिक्षणात शिकलेल्या मातेस महत्वाचे स्थान आहे. उपसहारा आफ्रिकन 18 देशातील 7-14 वयोगटातील मुलांच्या स्वातंत्र अभ्यासावरून असे दिसून आले कि शिक्षित मातांची 73% मुले शाळेत शिकत होती. त्यामानाने अशिक्षित माताची 51% मुले शाळेत जात होती. प्राथमिक संगोपनाची, आरोग्याची काळजी घेणाऱ्या मातांची मुले सहसा नापास होत नसत वा शाळा सोडत नसत. कुटुंबप्रमुख म्हणून स्त्रिया असणाऱ्या कुटुंबात मुलांच्या विकासासंबंधीच्या निर्णयावर प्रभाव दिसून येतो. 1998 मध्ये साधारण: 20% घरात कुटुंबात स्त्रिया प्रमुख होत्या. ह्या अंदाजावर आधारित लोक अमेरिकेत 24% उपसहारा आफ्रिकेत 22%, आशियात 16% आणि मध्यपूर्व व उत्तर आफ्रिकेत 13% घरामध्ये स्त्रिया प्रमुख आहेत. त्याच निर्णय घेतात. स्त्री प्रमुख असलेल्या घराचे, कुटुंबाचे एकाच सामाजिक वा अर्थिक गटात नेमके वर्गीकरण करता येत नाही.[7]

### 1.3.9 राजकीय स्थिती

स्वतंत्र भारतात महिला प्रधानमंत्री, राष्ट्रपती, राजदूत, आंतरराष्ट्रीय मंडळात प्रतिनिधी, राज्यपाल, मुख्यमंत्री, विधिमंडळ व संसद सदस्य झालेल्या भारतातील इतिहासात दिसून येतात.

विजयालक्ष्मी पंडीत यांनी संयुक्त राष्ट्र कार्यालयातील प्रथम महिला अधिकारी यु. एस.एस आर. मधील भारतीय राजदूत, यु.एस. व लंडनमधील हायकमिश्नर, उत्तर प्रदेश राज्य मंत्रीमंडळातील प्रथम मंत्री अशी अनेक पदे भूषविलीत.

इंदिरा गांधी या ‘भारतीय लोह स्त्री’ होत्या. भारताच्या प्रधानमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द अतिशय गाजली. यासोबतच सुचेता कृपलानी, मायावती, नंदिनी सत्पथी व शशिकला काकोडकर या उत्तर प्रदेश, गोवा व ओरिसाच्या मुख्यमंत्री राहिल्यात.

राजकुमारी अमृता कौर या केंद्रीय मंत्रीमंडळातील प्रथम महिला सदस्य होत्या व शानोदेवी राज्यविधिमंडळातील प्रथम महिला स्पीकर होत्या. शिला दिक्षित दिल्लीच्या मुख्यमंत्री, नजमा हेपतुल्ला राज्यसभेच्या उपाध्यक्षा, उमा भारती, सुषमा स्वराज, मेनका गांधी, वसुंधरा राजे, जयवंती मेहता, डॉ. रिता वर्मा, सुमित्रा महाजन तसेच प्रतिभाताई पाटील यांनी राट्रपती पद भुषविलेले आहे.

1952 ते 1998 या कालावधीत लोकसभेच्या 12 वेळा निवडणूका झाल्या त्यामध्ये 6338 जागापैकी आजपर्यंत अवघ्या 368 जागा महिला उमेद्वारानी जिंकल्या मतदानाचा हक्क असलेल्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण 45-48 टक्के असले

तरी लोकसभेत 1991 पर्यन्त एकूण खासदारांपैकी स्त्री खासदाराचे प्रमाण 5.42 टक्के होते व त्यातही मंत्रीमंडळात स्त्री सदस्याचे प्रमाण 7.29 टक्के होते.

1971 साली 9 टक्के स्त्रिया राजकीय पक्षाच्या सभासद होत्या. हे प्रमाण 1996 मध्ये 23 टक्के झाले. म्हणजेच 25 वर्षात दिडपटीने हे प्रमाण वाढले असे असले तरी अजुनही राजकीय पक्षांच्या एकून सभासदाराचे प्रमाण 1/5 इतकीच संख्या स्त्री सभासदांची आहे. याचा अर्थ राजकीय पक्ष सदस्यत्वाबाबत स्त्रियांचे प्रमाण पुरूषांपेक्षा कमी आहे.

महाराष्ट्र राज्य विधिमंडळात स्त्री सदस्याचे प्रमाण 1.9 टक्के व 9.3 टक्याच्या दरम्यान दिसते. ज्याची सरासरी 4.7% आहे. सर्व राज्याच्या विधिमंडळात हे प्रमाण 1.8 ते 6.3 आहे. ज्याची सरासरी 4% आहे म्हणजेच महाराष्ट्राच्या विधिमंडळात 100 सदस्यामागे 5 स्त्री सभासद तर सर्व राज्याच्या विधिमंडळात 100 सदस्यामागे 4 स्त्री सदस्य इतके कमी प्रमाण आहे.

पंचायत राज व्यवस्था ही पूर्वी गावगडयाच्या स्वरूपात आपल्या देशात आपल्या देशात अस्तित्वात होती. ब्रिटिशांच्या राजवटीत ही व्यवस्था मोडकळीस आली. महात्मा गांधीनी ग्रामस्वरांज्याची संकल्पना उदयास आणली. याच संकल्पनेतून भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण सामुहिक विकास कार्यक्रम अग्रक्रमाने राबविण्याचे ठरले होते. शासनाने या योजनेचे स्वरूप बदलविले व 1952 मध्ये बळवंतराव मेहता समितीने पंचायत राज पध्दतीची शिफारस केली होती. 10 राज्यानंतर ही पध्दती स्विकारणारे महाराष्ट्र 11 वे राज्य आहे. या पध्दतीत अनुसूचित जाती व जमातींना राखीव जागा आहेतच पण त्याचबरोबर जर निवडणूकीत महिला

उमेद्‌वार निवडून नाही आला तर दोन महिला प्रतिनिर्धींची नियुक्ती करण्याची सोय आहे. पंचायत राज व्यवस्थेमुळे स्त्रियांना आरक्षण मिळाल्यामुळे समाजातील सर्व स्तरातील स्त्रियांचा या विकास केंद्रीत शासनात समाविष्ट होत आहेत. महाराष्ट्रात ज्या ठिकाणी महिलांच्या ग्रामपंचायती आहेत तिथे विकासाच्या कामावर खूप चांगले लक्ष दिले गेले आहे.[८]

जगातील निरनिराळया प्रदेशातील स्त्रियांचा संसदेतील सहभाग पुढीलप्रमाणे आहे.

| | 1997 | 2006 |
|---|---|---|
| अमेरिका | 13% | 21% |
| उपसहारा आफ्रिका | 10% | 12% |
| आशिया | 13% | 16% |
| युरोप (नॉर्डिक) | 14% | 19% |
| अरबराज्य | 03% | 08% |

मार्च 2006 पर्यन्त तीनच देशामध्ये चिली, स्पेन, स्वीडन मंत्रीपदात स्त्री पुरूष समता साधली आहे. जानेवारी 2006 पर्यन्त 183 देशामध्ये स्त्रियांनी 858 खाती व मंत्रालये सांभाळली. म्हणजे जगभराच्या शासनातील मंत्र्यापैकी अवघी 14.3% मंत्रीपदे सांभाळली. 19 देशाच्या शासनामध्ये एकही महिला मंत्री नव्हती. ज्या शासनामध्ये स्त्रिया मंत्री होत्या, त्या केवळ एक ते तीन संख्येत होत्या. अफगाणिस्तान, आष्ट्रेलिया, मारोक्को, मोझाबिक, रवांडा आणि ताजिकीस्तान ह्या देशात स्त्रीयांच्या गटांनी प्रशिक्षण, प्रबोधन कायदे बदलण्यात, बालविवाह विरोधी मोहिमेचे आयोजन आदी कार्यक्रमात पुढाकार घेतला.[9]

एकूण लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण पन्नास टक्के असूनही सक्रिय राजकारणात सहभाग नगण्य आहे. पंचायत राजमध्ये पन्नास जागा राखीव असल्या तरी त्या ठिकाणी नेतृत्व महिला अभावानेच करताना दिसतात.[10]

## 1.4 व्यवस्थापन

प्रत्येक कृती व्यवस्थापनाभोवती फिरत असते. व्यवस्थापन ही संकल्पना नवीन नाही. खरे पाहता व्यवस्थापन हे जुन्या काळापासून चालत आलेले कार्य आहे. उत्कांतीच्या प्रक्रियेत माणसाने भटकी अवस्था सोडून एकाजागी कायमचे वास्तव्य करण्यास सुरूवात केली. माणूस समूहाने राहून शेती, मासेमारी, पशुपालन इत्यादी व्यवसाय करु लागला. त्या काळात सुध्दा व्यवस्थापन अस्तित्वात आले असे मानले जाते. ज्या ठिकाणी समूहिक कार्य आहे. तिथे व्यवस्थापनाची आवश्यकता असते.

व्यवस्थापनाची मूळे अगदी जुन्या काळात व सर्व संस्कृतीमध्ये आढळतात. बुध्दविहारांमध्येही व्यवस्थापनाचीच मुलतत्वे विद्यार्थ्यांना शिकवताना वापरली जायची. चिनी किंवा अरब व्यापारी व्यवस्थापनाची तत्वे वापरुनच व्यापार करत असत. वर्षानुर्षे जगाच्या विविध भागातील लोक व्यवस्थापनाचा उपयोग करुन विविध कार्य करत असते.

आधुनिक जगात व्यवस्थापनाशिवाय कोणतेही काम होवू, शकणार नाही. मग तो व्यापार असो, क्रीडा असो, राजकीय कार्य, सामाजिक कार्य असो. कोणत्याही कार्यात व्यवस्थापन अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असते.

मॅनस या लॅटिन शब्दांवरून इंग्रजी मॅनेजर शब्द आलेला आहे. मॅनस म्हणजे हात. एखादे कार्य करण्यासाठी लागणाऱ्या विविध गोष्टी हाताळणे,

मराठी शब्द व्यवस्थापन याच अर्थी वापरला जातो. पण आधुनिक काळात व्यवस्थापनाची संकल्पना एखादी गोष्ट हाताळणे एवढीच नसून त्या अनुषगांने येणाऱ्या सर्व बाबीचे व्यवस्थापन करणे.

मेरी पार्कर फॉले यांच्या मते, 'इतरांकडून काम करुन घेण्याची कला म्हणजे व्यवस्थापन.' तर हेन्री फेयॉलच्या मते, 'व्यवस्थापन म्हणजे अंदाज बांधणे, नियोजन करणे, संघटन करणे, आदेश देणे, समन्वय साधने व ताबा ठेवणे.' तसेच एफ.डब्लू.टेलर असे म्हणतात, 'व्यवस्थापन म्हणजे नियोजन, संघठन, निर्देशन व प्रक्रियेद्वारे साधनसामग्रीचा समन्वय साधून उद्दिष्टांची पूर्तता करणे.' तर जे.डी.मूने आणि ए.सी.रॅलेट यांचे मत असे आहे की, 'व्यवस्थापन लोकांना मार्ग दाखवून त्यांना प्रेरणा देण्याची कला आहे.' नियोजन करणे, संघटन करणे, मार्गदर्शन करणे, प्रेरणा देणे, नियंत्रण ठेवणे, लोकांकडून काम करवून घेण्याची कला म्हणजेच व्यवस्थापन होय. व्यवस्थापनात काम करवून घेण्याची कला अवगत असायला पाहिजे. [11]

### 1.4.1 गृहव्यवस्थापन

गृहव्यवस्थापन हा गृह आणि व्यवस्थापन या दोन शब्दांनी मिळून तयार झालेला आहे. गृह म्हणजे कुंटुबातील सर्व सदस्य या ठिकाणी प्रेमाने राहतात आणि आपल्या सर्व गरजांची पूर्तता करतात. विचारपूर्वक केलेली व्यवस्था असते. यात कमीत कमी साधनांचा उपयोग करून जास्तीत जास्त समाधान मिळविले जाते.

कौटुंबिक जीवनाच्या व्यवस्थापनाला गृहव्यवस्थापन म्हणतात. गृहव्यवस्थापनात कुंटुबात उपलब्ध असलेल्या मानवीय आणि अमानवीय साधन संपत्तीचे नियोजन, नियंत्रण आणि मुल्यांकन करून ध्येय गाठणे व सुख

समाधान मिळवणे समाविष्ट असते. गृहव्यवस्थापन म्हणजे उपलब्ध साधन सामग्री संपत्तीचा उत्तम प्रकारे उपयोग करून घेणे होय.

### 1.4.2 गृहव्यवस्थापणाची भूमिका

कौटुंबिक जीवनात गृहव्यवस्थापनाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. कुटुंबातील व्यक्ति म्हणजे पती, पत्नी व अपत्ये ही सर्व प्रेम व आदराने एकत्र राहतात. व्यक्ति कुटुंब बनवितो तेव्हा आपल्या कार्याची योजना तयार करावी लागते. उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा उपयोग करून कौटंबिक व सामूहिक संबधाचे हित जोपासले जाते. प्राचीन काळापासून मानव आपल्या गरजा भागवत आहे व आजही भागवितो. गरजा भागविताना कमी खर्चात जास्तीत जास्त समाधान कसे प्राप्त होईल यासाठी सर्व व्यक्ति प्रयत्नशील असतात.

नॉल (Knoll) यांच्या मते, ‘गृहव्यवस्थापन म्हणजे केवळ काम करणे नसून विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयानुसार केलेले काम होय.’ (Home Management is not mere performance of work, rather it is activity or performance that is directed by conscious dicisions.)

तर डॉ. देवदासच्या मतानुसार, ‘कौटुंबिक उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी कौटुंबिक साधनसंपत्तीचा उपयोग कशाप्रकारे करायचे याबद्दल घेण्यात येणारे निर्णय म्हणजे गृहव्यवस्थापन होय.’ (Home Management consists of making decsions about using family resource to achieve family goals.)

ग्रॉस, क्रॅण्डाल आणि नॉल यांच्या मते,‘कौटुंबिक ध्येये साध्य करण्याच्या उद्देशाने साधनसंपत्तीची निर्मिती व उपयोग करण्यासाठी केलेले हेतूवर्तन म्हणजे गृहव्यवस्थापन होय.’(Home Management consists fo purposeful behaviour involved in the creation and use of resources to achieve family goals.)[6]

तसेच गुडशीयर व क्लोहर यांच्या मतानुसार,‘मानवीय आणि भौतिक साधनसंपत्तीच्या परिणामकारक उपयोगाव्दारे मुल्ये आणि ध्येये साध्य करण्याची व्यवस्थापन ही प्रक्रिया आहे.’(Management is the process of realising values and goals through the effective use of human and non human resources.)

निकेल आणि डॉर्सी यांच्या मते, ‘गृहव्यवस्थापन म्हणजे कौटुंबिक लक्ष्य प्राप्त करण्याकरिता उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचे नियोजन, नियंत्रण, मूल्यांकन करणे.’(Home Management is planning, controlling and evaluating the use of the resource of the family for the purpose of attainig family goals. )[12]

### 1.5 संशोधन अभ्यासाचे उद्देश :-

भारतीय महिलांमध्ये कठोर परिश्रम करण्यांची तयारी असते. कामांचे योग्य नियोजन करून निश्चित उद्दिष्ट पूर्ण करू शकतात. महिलांमध्ये असलेले विविध कौशल्याची माहिती करुन त्यांचा विकास करणे. जगातील लोकसंख्येच्या अर्ध्ये म्हणजे पन्नास टक्के महिला आहेत. त्यांचा विकास झाला तरच भावी पिढीचा विकास आपोआपच होईल. कुटुंबातील एक स्त्री शिकली तर सर्व कुटुंबाला सुधारु शकते. एका कुटुंबाच्या विकासामुळे देशाचा विकास होवू शकतो. हा दृष्टिकोन समोर ठेवून महिलांचा कौटुंबिक व्यवस्थापन, सामाजिक, राजकीय, अर्थिक विकासाचा अभ्यास करण्यासाठी मी पुढील उद्दिष्टे समोर ठेवून संशोधन केले आहे.

1. महिलांमध्ये असलेले कौटुंबिक व सामाजिक व्यवस्थापन कौशल्य तपासणे.
2. कुटुंब व समाजाच्या विकासात स्त्रियांच्या कार्यक्षमतेचे योगदान अभ्यासणे.
3. भारतीय स्त्रियांची निर्णय क्षमता तपासणे.

4. ग्रामीण-शहरी व अशिक्षित-शिक्षित स्त्रियांचा अभ्यास करणे.

5. स्त्रियांमध्ये असलेले अभिप्रेरण कौशल्य जाणून घेणे.

6. बचत गटांचा अभ्यास करणे.

## 1.6 संशोधन अभ्यासाची गृहितके :-

अभ्यासासाठी निवडलेल्या संशोधन समस्येचे कारण शोधणे संशोधकाचे ध्येय असते. जेव्हा संशोधक संशोधन करीत असतो तेव्हा तो समस्यांच्या कारणाविषयी एक अंदाज करतो. या अंदाजालाच तांत्रिक परिभाषेत गृहितके असे म्हणतात. गृहितके हे संशोधन समस्येचे किंवा घटनेचे तात्पुरते स्पष्टीकरण असते. गृहितक हे जरी अंदाज असला तरी तो निव्वळ काल्पनिक नसतो. हे गृहितक घटकाच्या निरीक्षणावर आधारलेले असते. गृहितकांमुळे संशोधनाला एक निश्चित दिशा प्राप्त होत असते. गृहितकांमुळे संशोधकाला मार्गदर्शन मिळत असते. गृहितकाच्या मदतीशिवाय आपणास कशाचे निरीक्षण करावयाचे हे समजू शकत नाही. गृहितकाला संशोधनात अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

मनुष्य आपल्या जीवनामध्ये सतत कोणते तरी कार्य करीतच असतो. शिक्षण, व्यवसाय, ग्रामीण, शहरी अशा वेगवेगळया परिस्थितीशी संबंधित वेगवेगळया व्यक्ति वेगवेगळे कार्य करीत असतात. परिस्थितीसापेक्ष कार्य करणे हा व्यक्तिचा स्वभाव आहे. हे कार्य करीत असतांना तो त्या कार्याच्या संबंधीत आपल्या मनामध्ये विचार करीत असतो. त्याच्या या कल्पना निर्मितीतून त्याला ते करण्याची दिशा मिळते व प्रेरणा सुध्दा मिळते. त्या या

कल्पना निर्मितीलाच वैज्ञानिक भाषेत उपकल्पना किंवा गृहितकृत्य असे म्हणतात.

**गृहितकृत्य**

रुमेल आणि बर्लीन यांच्या मते, ‘पूर्ण परिक्षणाअंती जे विधान संशोधनकार्यासाठी स्वीकारले जाते किंवा नाकारावे हे ठरविले जाते त्या विधानाला गृहितकृत्य असे म्हणतात.’ तर प्रा.पी.वाय थोटे यांना असे वाटते की, ‘संशोधन कार्य सुरू करण्याअगोदर संशोधन विषयासंबंधी संशोधकाच्या मनात निर्माण झालेले विचार किंवा कल्पना म्हणजे गृहित्यकृत्य असे म्हणतात.’ एमोरी एस. बोगार्ड यांचे असे मत आहे की, ‘परिक्षण केल्या जाणा-या विचारांना गृहित्यकृत्ये म्हणतात.’ तसेच गुड आणि हॅट यांना असे वाटते की, ‘गृहित्यकृत्य म्हणजे असे विधान आहे, की ज्याची सप्रमाणता ठरविण्यासाठी परीक्षण केले जाते आणि ते पुढील संशोधनासाठी उपयुक्त असते.’ [13]

संशोधन करण्यापूर्वी संशोधकाच्या मनात विचार व कल्पना असतात त्यास गृहित्यकृत्य म्हणतात. गृहित्यकृत्य हे संशोधनकार्यासाठी अत्यंत महत्वाचे मार्गदर्शक ठरतात.

‘व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून, नांदेड जिल्हयातील महिलांचा गृहिणीकडून गृहव्यवस्थापकांकडे त्या बदलाच्या भूमिकेचा व्यष्टी अभ्यास.’ या विषयी अभ्यास करीत असताना कुटुंबातील महिलांना केद्रबिंदू मानण्यात

आलेले आहे. मर्यादा लक्षात घेवूनच खालील गृहीतकेच्या आधारावर संशोधन करण्यात आले आहे.

1.महिलाकडे चांगले संघटन व नेतृत्व गुण आहेत.

2.महिलांकडे व्यवस्थापकीय व गृहव्यवस्थापनाचे कौशल्य आहेत.

3.भारतीय स्त्री सहनशील व कठोर परिश्रम करणारी आहे.

4. महिला विविध क्षेत्रात कार्य करीत आहे.

### 1.7 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधनासाठी वेळ व पैसा याचा विचार करून संशोधनाची व्याप्ती नांदेड जिल्हयापुरतीच मर्यादीत आहे. ही निवड मर्यादित क्षेत्राची असली तरी सर्वसमावेशक स्वरुपात प्रतिनिधीत्व करणारे क्षेत्र आहे.

सदरील संशोधनाकरीता संशोधन अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा पुढील प्रमाणे ठरविण्यात आलेली आहे.

1. हा अभ्यास फक्त महिलांपुरताच मर्यादित राहील.

2. या अभ्यासाची मर्यादा नांदेड जिल्हयांपुरतीच मर्यादित राहिल.

3. हा अभ्यास इ. 2010 ते 2015 या काळापुरताच मर्यादित राहिल.

### 1.8 संशोधन अभ्यासाचे अपेक्षित योगदान

कौटुबिक कार्यात महिलांचे कार्य अत्यंत महत्वाचे कार्य आहे. गृहव्यवस्थापन करत असताना गृहिणीना अनेक अडचर्णीना सामोरे जावे

लागते. या अडचणी सोडविण्यासाठी संशोधन कार्याने मदत होईल. कोणतेही कार्य योग्य व्यवस्थापनामुळे सहज व सोपे होत असते याचे ज्ञान होईल. विविध क्षेत्रात या संशोधनाचा फायदा होण्यास मदत होईल.

1. गृहव्यवस्थापनाचे महत्व समजेल.
2. केंद्र व राज्य सरकारला महिलाविषयी धोरण आखताना उपयोग होईल.
3. या संशोधनाच्या आधारावर विविध संशोधन अभ्यासकांना भावी संशोधनासाठी मदत होईल.
4. महिलामध्ये असलेल्या व्यवस्थापकीय कौशल्यांची माहिती मिळेल.
5. गृहीणी म्हणून समाजात महिलांना जे दुय्यम स्थान आहे, त्या ऐवजी गृहव्यवस्थापक म्हणून प्रथम स्थान मिळण्यासाठी उपयोग होईल.

## 1.9 संशोधन अभ्यासाची निवड

जगातील एकूण लोकसंख्येच्या पन्नास टक्के महिलांची संख्या आहे. गांधीजीच्या मते भारतीय समाजाची प्रगती आवश्यक असेल तर स्त्रियांचा कार्यात्मक सहभाग वाढविला पाहिजे. भारत हा खेडयांचा देश असल्यामुळे त्यांचा विविध क्षेत्रात पर्दापण होणे गरजेचे आहे. यासाठी सर्वांगिण पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. आपल्या समाजात स्त्रियांची स्थिती फारशी समाधानकारक नाही. महिलांचा गृहिणी म्हणून कार्य करीत असताना महिलांना अनेक समस्या येतात. या समस्या त्या कशा पध्दतीने सोडवितात. व जास्तीत जास्त सुख-समाधान मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. गृहव्यवस्थापकाची भूमिका ती बजावित असते. काळानूसार कुटुंबातील साधनसामग्रीतही विकास झाला आहे. नवीन तंत्रज्ञानाचा स्वयंपाकघरातील

उपकरणाचा वापर होत आहे. त्यामुळे कार्यात सुलभता येत आहे. कुटुंबातील कार्याचे व्यवस्थापन करून सामाजिक, राजकीय, अर्थिक तसेच इतर क्षेत्रातही तिचे यशस्वी पर्दापण होत आहे. कुटुंबातील कार्याचे व्यवस्थापन अत्यंत महत्वाचे असते. लहान घटकांचा विकास झाला तरच मोठया घटकांचा विकास होत असतो. कोणत्याही कामासाठी कुटुंबातून प्रोत्साहन मिळत असते. कुटुंबामुळे परस्परांविषयी नात्यामध्ये विश्वास निर्माण होतो, आत्मविश्वास वाढतो, खरे-खोटे, चांगले-वाईट ओळखण्याची सवय लागते. अशाप्रकारे परस्पर सहकार्य, सामंजस्य, विचार याची गरज गाव,ग्रामपंचायत, नगरपालिका, नगर परिषद, महानगरपालिका यांना असते. रस्त्याचे काम, सार्वजनिक कामात आपल्या परिसरातील बदलांविषयीच्या निर्णयात एकमेकांची गरज असते. कुटुंबामध्ये परस्पर सुखी, समृध्द, आनंदी कुटुंबात जर वातावरण असेल तर त्या कुटुंबातील व्यक्तिची प्रगती ही होत असते. व्यवस्थापक ज्याप्रमाणे आपल्या संस्थेचा विकास व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील असतो त्याचप्रमाणे गृहिणी आपल्या कुटुंबाच्या विकासासाठी प्रयत्नशील असते.

नोकरीतून मिळणारे उत्पन्न असो कि, उद्योग-व्यापारापासून मिळणारे उत्पन्न असो शेवटी ते आपल्या कुटुंबासाठीच वापरले जाते. तेव्हा मिळणारे एकूण उत्पन्नाचे शेवटचे उपयोजन कुटुंबप्रमुखाकडूनच होते. हे उपयोजन म्हणजेच राष्ट्राचा, समाजाचा खरा राहणीमान स्तर होय. तो संतुलित सुयोग्य असणे गरजेचे आहे. हे करण्यासाठी अर्थनियोजन, अंदाजपत्रकाचे नियोजन याचे ज्ञान तर हवेच पण खर्चावर नियंत्रणही हवे आणि कुटुंबातील व्यक्तिची कार्यक्षमता पूर्णपणे वापरली गेली पाहिजे. त्यासाठी त्यांना योग्य ते शिक्षण व प्रशिक्षण असले पाहिजे. त्यांच्याकडून कुटुंबाची उद्दिष्टये (आनंदीवातावरण,

निरोगी दिर्घायुष्य, इच्छाची पूर्ती) पूर्ण करता आली पाहिजे. त्यासाठी कुटुंब प्रमुखाच्या भुमिकेत असणारी स्त्री गृहिणी पेक्षा गृहव्यवस्थापकाच्या भुमिकेतून जाने नितांत आवश्यक आहे. त्या दृष्टिने अभ्यासाची गरज वाटली.

### 1.10 संशोधनाचा आराखडा

संशोधन करण्यापूर्वी संशोधनकाला संशोधनाचा उद्येश डोळयासमोर ठेवून ते कार्य करावे लागते. उद्देश डोळयासमोर ठेवून संशोधनाची मांडणी करावी लागते. ही मांडणी करणे खुप गरजेचे आहे नियोजित मांडणीतून संशोधनास दिशा मिळते व योग्य त्या निष्कर्षाप्रत संशोधन पोहचण्यासाठी मदत होते.

प्रस्तुत संशोधनाच्या शोध प्रबंधाचा आराखडा खालील प्रमाणे आहे.

### प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये कुटुंबात महिला विविध प्रकारचे कार्य करीत असतात. प्रत्येक कार्याचे नियोजन करणे, नियोजनाप्रमाणे कार्य करणे गरजेचे असते. त्यातून जास्तीत जास्त सुख समाधान मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. जसे व्यवसायात व्यवस्थापकाचे कार्य जेवढे महत्वाचे आहे तेवढेच महत्वाचे कार्य महिलांचे कुटुंबात आहे. स्त्रियांची भुमिका कशी काळानुसार त्यात परिवर्तन होत गेले. तसेच बदलत्या काळानुसार महिला आपली भुमिका बजावतात याचा अभ्यास करण्यात आला. महिलांचा गृहिणीकडून गृहव्यवस्थापक या बदलाचा अभ्यास करताना विविध प्रकारच्या साहित्यांचा आढावा घेण्यात आला आहे की ज्यामुळे सदर विषयांचा सखोल अभ्यास करता येईल. यामध्ये पुस्तके, ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, अहवाल इ. चा वापर करण्यात आला

आहे. गृहव्यवस्थापन कार्याची आवश्यकता, गृहव्यवस्थापनाचे महत्व, गृहव्यवस्थापनाचे उद्येश, संशोधन अभ्यासाची गृहीतके, संशोधनाची पध्दती, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आणि संशोधन आराखडा यांची मांडणी करण्यात आली आहे.

**प्रकरण दुसरे - संशोधन पध्दती व संशोधन साहित्याचा आढावा**

कोणत्याही विषयातील संशोधन करीत असताना संशोधन पध्दती हे अत्यंत महत्वाची असते. योग्य संशोधन पध्दतीचा वापर केला तर संशोधन हे यशस्वीरित्या पार पाडते. या प्रकरणात संशोधनासाठी कोणत्या पध्दतीचा उपयोग केला. त्याचे विश्लेषण केले आहे. संशोधन हे शास्त्रशुध्द व विषयाला सुसंगत असावे लागते. संशोधनाची पध्दती, संशोधनाची व्याप्ती व क्षेत्र नमुना निवड, तथ्य संकलन सांकेतिकरण, वर्गीकरण करण्यात आले आहे.

संशोधन करीत असताना महिला विषयी संबंधी संशोधनाचा विविध संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला. महिलांच्या संदर्भात झालेल्या विविध संशोधन साहीत्याचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे संबंधीत विषयात कोणत्या कोणत्या विषयावर संशोधन झाले व त्यातून कोणते निष्कर्ष निघाले हे समजण्यास मदत होते.

**प्रकरण तिसरे - नांदेड जिल्हयांची पार्श्वभूमी**

तिसऱ्या प्रकरणात महिलांचा गृहिणीकडून गृहव्यवस्थापक या बदलाचा अभ्यास करीत असताना प्रथम आपण ज्या भागाचा आपणास अभ्यास करायचा आहे, त्या भागाची संपूर्ण माहिती करून घेणे गरजेचे असते. ती माहिती करून घेण्यासाठी नांदेड जिल्हयांचा परिचय करुन घेण्यात आलेला आहे.

यामध्ये नांदेड जिल्हयांचे भौगोलिक स्थान व क्षेत्रफळाचा अभ्यास करण्यात आला. त्या भागातील विविध प्रकारचे येणारे पीक. पीकासाठी पोषक हवामान, जमीन यासंबंधीचा अभ्यास करण्यात आला आहे. विकासावर प्रभाव टाकणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे लोकसंख्या होय. ग्रामीण भागातील व शहरी भागातील लोकसंख्येचे स्त्री व पुरूषांचे प्रमाण व स्त्री व पुरूषांचे साक्षरतेचे प्रमाण याचाही अभ्यास करण्यात आला. त्या जिल्हयातील असलेले विविध उद्योग इत्यादीचा अभ्यास केलेला आहे. यामुळे तेथील परिसराची माहिती होते.

**प्रकरण चौथे - गृहिणीत असलेल्या व्यवस्थापकीय दृष्टिकोनाचा अभ्यास**

प्रस्तुत प्रकरणात गृहिणीत असलेल्या व्यवस्थापकीय दृष्टिकोनाचा अभ्यास करण्यात आला आहे. गृहिणीला कुटुंबात विविध प्रकारचे कार्य करावे लागते. जसा व्यवस्थापक आपले कार्य करीत असताना नियोजनापासून ते नियंत्रणापर्यत सर्व व्यवस्थापकीय कार्य करीत असतो. त्याचप्रमाणे गृहिणी कुटुंबात अनेक प्रकारचे कार्य पार पाडीत असते. गृहिणीचे कार्य, गृहिणीच्या कार्याचे महत्व याचे विवेचन यात केले आहे. व्यवस्थापनाची माहिती, कार्य, गरज यांचा उल्लेख केलेला आहे. गृहिणी करीत असलेले विविध व्यवस्थापकीय कार्याची महिती जसे नियोजन, संघटन, नेतृत्व गुण, अभिप्रेरण, नियंत्रण हे सर्व कार्य महिला कुटुंबात सतत करीत असते. याची माहिती या प्रकरणात घेतलेली आहे. कुटुंबात गृहव्यवस्थापन हे प्राचीन काळापासून चालत आलेले आहे. त्यात काळानुसार बदल होत गेले आहेत. वैज्ञानिक प्रगती, आधुनिक उपकरणे याचा उपयोग गृहव्यवस्थापनात केल्यामुळे ते अधिक सुलभ होत गेले आहे. गृहव्यस्थापन करत असताना काळानुसार त्यात बदल केले

पाहिजे. काळानुसार त्यात झालेले बदल हे बदल होणे ही काळाची गरज आहे याबाबत माहीती सांगितली आहे.

**प्रकरण पाचवे - गृहिणीच्या कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास**

प्रस्तुत प्रकरणामध्ये कुटुंबात महिला विविध प्रकारचे कार्य करीत असतात. त्याच्या कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. गृहिणी कुटुंबातील कार्य आपल्या कुटुंबातील व्यक्तिच्या समाधानासाठी करत असते. प्रत्येक कार्याचे नियोजन करणे, नियोजनाप्रमाणे कार्य करणे गरजेचे असते. त्यातून जास्तीत जास्त सुख समाधान मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. गृहिणीचा कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रकरण सहावे - निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणात महिलांचा गृहिणीकडून गृहव्यवस्थापक या बदलाचा अभ्यास यामध्ये सखोल अभ्यासाअंती विविध निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत. यामध्ये काही बाबी समर्थनीय जाणवल्या तर काही बाबीची उणिव जाणवली. या उणिवा दूर करण्यासाठी योग्य उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ सूची


01 डॉ. लीना कांडलकर, ‘कौटुंबिक संसाधनाची संकल्पना’, विद्या प्रकाशन, नागपूर-2012. पृ. क्र. 21,22

02 एस. एम कोलते, ‘व्यवसाय व्यवस्थापन ’, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर -2011 पृ. क्र.56.

03 डॉ. शीला द. देशपांडे, ‘कुटुंबसंस्था आणि परित्यक्ता स्त्री ’, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर- 2011, पृ.क्र. 19,20,21.

04 डॉ. स्मीता मेहेत्रे, ‘भारतातील स्त्रीचे समाजातील स्थान ’, श्री साईनाथ प्रकाशन-नागपूर. 2011 पृ.क.65,66,67

05 डॉ. शीला द. देशपांडे ‘ कुटुंबसंस्था आणि परित्यक्ता स्त्री ’, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर- 2011, पृ.क्र. 21,22,23.

06 यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, महिलांचे सबलीकरण दारिद्रय निर्मुलन व स्वयंसहायता गट, प्रमाणपत्र अभ्याक्रम पुस्तिका पृ. क्र.12.

07 ज. श. आपटे व पुष्पा रोडे, ‘भारतातील महिला विकासाची वाटचाल ’, डायमंड पब्लिकेशन्स-पुणे. 2012, पृ.क्र. 83,84,85.

08 डॉ. स्मीता मेहेत्रे, ‘भारतीय स्त्री आणि मानवाधिकार ’, श्री साईनाथ प्रकाशन-नागपूर. 2011 पृ.क्र.6157,158,159,160.

09 ज. श. आपटे व पुष्पा रोडे, ‘भारतातील महिला विकासाची वाटचाल ’, डायमंड पब्लिकेशन्स-पुणे. 2012, पृ.क्र. 85.

10 प्रा. एम.यु.मुलानी, महिला स्वयंसहायता बचतगट डायमंड पब्लिकेशन,पुणे, 2006. पृ. क्र.57.

11 एस. एम कोलते, ‘व्यवसाय व्यवस्थापन ’, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर -2011 पृ. क्र.56

12 डॉ. लीना कांडलकर, ‘कौटुंबिक संसाधनाची संकल्पना ’, विद्या प्रकाशन, नागपूर-2012. पृ. क्र .27.

13 डॉ. वा. भा. पाटील, ‘संशोधन पध्दती ’, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव. पृ. क्र 339,340.